

# कथा स्वातंत्र्याची

**अमरनाथ चंडालिया**
**चंडालिया**

पुणे
भ्र. ७७९८ ९२५ २७०

आजचा दिवस इतर दिवसांसारखा नाही. आज १५ ऑगस्ट. स्वातंत्र्यदिन. पंतप्रधानांचं राष्ट्राला उद्देशून भाषण. राष्ट्रउभारणीचे संकल्प... देशाला महाशक्ती बनविण्याची आश्वासनं... हवेत उडणारे रंगीबेरंगी फुगे... पंतप्रधानांच्या हातातून सुटून फडफडत वर जाणारी कबूतरं. दूरदर्शनच्या बातम्या – 'संपूर्ण देशात स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.'

पण परशुरामला त्याचं काय, त्याच्या दृष्टीनं तर आज सुट्टीचा दिवस. उशिरा उठायचं असं ठरवूनच तो झोपला होता. कारखान्याची सकाळी साडेसहाची शिफ्ट असल्यानं त्याला रोज लवकर उठावं लागत असे. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी थोडा आराम करायचा मोह त्याला व्हायचा.

त्याचा धाकटा मुलगा मात्र खूप पहाटे उठला होता. त्याच्या दृष्टीनं आजचा दिवस म्हणजे खास दिवस होता. वर्गात कालच शिक्षकांनी सर्व सूचना केल्या होत्या. झेंडावंदनाला जायचं म्हणजे जणू काही मोठ्या देशकार्याला जायचं, अशा आविर्भावात त्याची तयारी चालली होती अन् जर देशकार्याला जायचं असेल तर

उशीर नको आणि चुकारपणा तर नकोच नको.

गडबडीत त्याच्या हातातून तांब्या सुटला. रूमच्या एका कोपऱ्यात बनविलेल्या न्हाणीत तो आंघोळ करीत होता. जवळच स्टोव्हवर नाश्ता बनविणाऱ्या त्याच्या आईनं डोळे वटारले. इशारा केला... एक बोट तोंडावर ठेवून जणू डोळ्यांनीच बोलली, 'आवाज कशाला करतोस? आप्पांची झोपमोड होईल.'

तांब्याच्या खणखणाटानं परशुरामची झोपमोड झालीच होती. त्यानं पुन्हा झोपायचा प्रयत्न केला पण डोळा लागला नाही. तो उठून बसला. सगळ्या रूममध्ये अंथरुणं पसरली होती. भिंतीवरच्या छोट्या आरशात त्याचा धाकटा मुलगा केस विंचरत होता. त्याची प्रत्येक हालचाल तडफदार होती. त्याच्या अंगात जणू वीज संचारली होती. त्याच गडबडीत त्यानं कसाबसा नाश्ता उरकला आणि तो बाहेर पडला. त्याची आई त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे कौतुकानं बघत होती.

परशुरामला त्याचं लहानपण आठवू लागलं. त्या काळी त्यालाही झेंडावंदनाला जायचा खूप उत्साह असायचा. त्याची सकाळीच लगबग सुरू होत असे. घरातली पुरुषमंडळी त्याच तयारीला लागलेली असायची. शेजारचे नारायणआप्पा खास ठेवणीतले कपडे घालायचे. गोमातात्या कडक कंजीचे नेहरूशर्ट पायजमा घालून डोक्यावर इस्त्री केलेली गांधीटोपी घालायचे.

झेंडावंदन करणं म्हणजे त्या काळी प्रत्येकाला ते आपलं राष्ट्रीय कर्तव्य वाटायचं. देशाप्रति व्यक्त केलेला सन्मान आणि अभिमान. आता तो उत्साह जाणवत नाही. लोकांचा भ्रमनिरास झालाय. सगळीकडे उदासीनता पसरलीये.

सकाळी झेंडावंदनात झेंड्यांची रस्सी खेचणारे हात, संध्याकाळी एखाद्या बिअरबारच्या उदघाटनाची रिबिन कापताना दिसतात. सैनिकांकडून मानवंदना घेणारे राजकीय नेते मोठमोठ्या घोटाळ्यात अडकलेले सापडतात.

परशुराम जवळच झोपलेल्या मोठ्या मुलाकडे पाहत होता. तो एकदम निवांत झोपला होता. कॉलेजच्या सेकंड इयरला शिकतोय. त्याला झेंडावंदनाला जायची इच्छा नाही वाटतं. रात्री आईला सांगूनच झोपला होता, 'लवकर उठवू नकोस, उशिरा उठणार, मग दुपारी आम्ही सगळे मित्र पिकनिकला जाणार... रात्री बाहेरच खाणार, चायनीज.'

परशुराम विचार करू लागला. या नव्या पिढीची तऱ्हाच बदललीय. यांच्या दृष्टीनं जीवन म्हणजे फक्त 'एन्जॉय.' आणि देशप्रेम म्हणजे टाइमपास. हे तरुण असल्या फालतू गोष्टींमध्ये का अडकत चाललेत? ते देशाबद्दल काही विचार का करत नाहीत?

पण तसं पाहता या देशानं यांना दिलंय तरी काय? डिगऱ्या घेऊन फिरतायत. नोकऱ्या नाहीत. आणि ज्यांना कशा तरी नोकऱ्या मिळाल्या, त्यांची तरी हालत काय आहे?

परशुरामच्या कारखान्यात नोटीस लागली होती. व्हीआरएस योजना आलीये. वेळेपूर्वीच सेवानिवृत्तीची योजना. परशुरामचा वर्क्स मॅनेजर वारंवार त्याच्यावर दबाव टाकत होता, ''काही दिवसांत कारखाना इथून जाईल. खूप कमी लोकांना कामावर ठेवण्यात येईल. शहाणे असाल तर घेऊन टाका व्हीआरएस.''

परशुराम विचार करून अस्वस्थ व्हायचा. मुलं अजून शिकतायत. सेवानिवृत्ती घेऊन कसं चालायचं? घर कसं चालवायचं?

त्याच्या बायकोनं चहा आणला. मोठा मुलगा अजूनही झोपलेलाच होता. चहाचा कप एका हातात पकडून दुसऱ्या हातानं रिमोट दाबून परशुरामन

टीव्ही चालू केला. राजधानीवरून स्वातंत्र्यदिन समारोहाचं प्रक्षेपण चालू होतं. उद्घोषक अभिनंदन करून शुभेच्छा देत होता. दृश्य होतं राजघाटाचं. तिथं पंतप्रधान क्रमानं सर्व नेत्यांच्या स्मृतिस्थळांवर जाऊन पुष्पमाला अर्पण करीत होते. त्यानंतर त्यांच्या गाड्यांचा ताफा इंडिया गेट, अमर जवान ज्योतीजवळ पोहोचला.

कॅमेरा कुठंतरी खूप उंचीवर होता. खूप लांबचं दृश्य दिसत होतं. नंतर कॅमेरा लाल किल्ल्यासमोरचं दृश्य दाखवू लागला. प्रथम कॅमेरा आकाशाकडे गेला. दिसू लागला उगवता सूर्य... उडणारे पक्षी... 'स्वातंत्र्याची पहाट, किती सुंदर! किती रमणीय!' उद्घोषक उद्गारला.

कॅमेरा आता खाली सरकून लाल किल्ल्याच्या समोरील समारोहाचं दृश्य दाखवू लागला. मखमली पायघड्या, लाल कार्पेट अंथरलेला मंचक, एका भव्य खांबावर गुलाबाच्या पाकळ्यांसह दुमडून घडी केलेला, फडकण्याच्या प्रतीक्षेत असलेला तिरंगा.

समोर दुतर्फा खुर्च्यांच्या रांगा. त्यावर स्थानापन्न झालेले मंत्री, राजकारणी, उच्चाधिकारी आणि विविध देशांचे राजदूत. त्यापलीकडे आखीवरेखीव रेषांमध्ये उभी असलेली शाळकरी मुलं. दोन्ही बाजूंना अर्धगोलाकार सरकारी अधिकारी आणि कर्मचारी... आणि त्यानंतर सगळीकडे पोलिसच पोलिस... जिकडं बघावं तिकडं पोलिस. बंदुका ताणलेल्या. जणू एखाद्या धोक्याच्या इशाऱ्यानं प्रत्येक जवान सावधान, पोजिशन घेऊन तैयार. शहरात चौकाचौकांत नाकाबंदी. पावलापावलावर चौकशी... धोका! सगळीकडे धोका! कणाकणात धोका! मनामनात धोका!

धोक्याच्या सावटाखाली असलेल्या त्या वातावरणात झेंडा फडकविण्यात आला. त्यानंतर बुलेटप्रूफ काचेमागे उभं राहून पंतप्रधान राष्ट्राला उद्देशून बोलू लागले. म्हणजे त्यांचं भाषण सुरू झालं. त्यांच्यासमोर उभे होते मंत्रिगण... विविध देशांचे राजदूत... वेगवेगळ्या मंत्रालयांचे सचिव तसेच उच्चाधिकारी... आणि उंची वस्त्रांमध्ये नटूनथटून आलेल्या या साहेबलोकांच्या मॅडम... विराजमान!

सगळीकडे शानदार, वजनदार आणि विशेषाधिकार प्राप्त व्यक्ती दिसत होत्या.

ज्याला उद्देशून पंतप्रधान भाषण करीत होते त्या भारताच्या सामान्य नागरिकांचा मात्र तिथं कुठं पत्ताच नव्हता.

दूर खूप दूर चांदणी चौकात देशाचा तो सामान्य नागरिक गर्दी करून उभा होता. पोलीस त्याला दांडक्यांनी मागे ढकलत होते.

पंतप्रधानांचं भाषण खूप लांबलचक होतं. देशाच्या विकासासाठी विदेशी भांडवलाची किती गरज आहे यावर त्यांनी विस्तृत विवेचन केलं. देशात कोणकोणत्या भागात आणि उद्योगांत विदेशी भांडवलाची गुंतवणूक झाली आहे याची माहिती दिली.

विदेशी भांडवलाला पूर्ण संरक्षण देण्यात येईल असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

जोमदारपणे ते म्हणाले की, ''विदेशी भांडवलाला देण्यात येणाऱ्या सवलतींमध्ये अजिबात कपात केली जाणार नाही.''

जणू काही समोर बसलेल्या धनदांडग्यांना ठोस आश्वासनं देत असावेत.

मग त्यांचा स्वर जरा खाली आला. दिलासा देण्याच्या आविर्भावात ते म्हणाले, ''चांगले दिवस पाहण्यासाठी काही कटू अनुभव घ्यावे लागतील. देशाच्या हितासाठी थोडा त्रास सहन करावा लागेल.''

ते बोलत होते... आता कदाचित त्या सामान्य नागरिकासाठी जो दूर चौकात

पोलिसांच्या लाठ्यांनी इकडे तिकडे ढकलला जात होता.

‘‘देशाचा चौमुखी विकास होत आहे. उदारीकरणाने देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी आली आहे. देश आता जगातील एक महाशक्ती होणार आहे. जनतेच्या जीवनात सुखसमृद्धी येणार...’’

पंतप्रधानांचं भाषण चालू होतं. निरंतर चालूच होतं.

परशुरामनं रिमोट उचलून टीव्ही बंद केला. तो विचार करू लागला. सुखसमृद्धीच्या बाता मारल्या जात आहेत. खरोखर सुखसमृद्धी आलीये का? त्यानं मागच्या वर्षी पत्रे काढून विटांच्या भिंती बांधल्या. झोपडीच्या जागी पक्कं घर उभं राहिलं. सिंगल रूमच्या त्या खोलीवर ॲसबॅस्टॉसचे पत्रे टाकले. मग मुलांच्या हट्टामुळे त्याला रंगीत टीव्ही घ्यावा लागला. तो हप्त्यानं घ्यावा लागला. कारण मागील अनेक वर्षांपासून जमवलेली रक्कम तर ती छोटीशी खोली बांधण्यात संपून गेली. अजून भिंतींना प्लास्टर नाही. खाली नीट फरशी नाही. मोडक्यातोडक्या फरशा आणून त्या सिमेंटमध्ये बसवून घेतलेल्या.

तरीसुद्धा त्याला किती आनंद झाला होता... जेव्हा या शहरात आला तर खूप दिवस नातेवाईकांकडे राहिला. मिळेल ते काम केलं. पुढे कारखान्यात काम मिळालं तेव्हा बायकोमुलांना इकडं आणायचा विचार करू लागला. एका झोपड्यात संसार थाटला. आता त्याच झोपडीचं पक्क्या खोलीत झालेलं रूपांतर... त्याला सुखावून गेलं. एवढ्याशा गोष्टीसाठी कितीतरी वर्षं गेली.

एकट्याच्या पगारावर घर चालत होतं. त्याची बायको काही कामधंद्यासाठी बाहेर पडायचं म्हणायची, पण तो तिला रोखायचा. म्हणायचा, मुलांचे हाल होतील. त्यांच्या शिक्षणावर परिणाम होईल.

तो एकटाच संसाराचा गाडा खेचत राहिला. पण कसंतरी टिकवून ठेवलेला हा समतोल ढासळतो की काय असं त्याला वाटू लागलं होतं. त्याच्या कारखान्यात व्हीआरएसच्या नावाखाली अनेकजणांना काढून टाकण्यात आलं होतं. जास्त रक्कम मिळते या आमिषानं जे गेले ते आता पश्चात्ताप करीत होते. परशुरामला त्याचा मित्र तुकाराम आठवायचा. त्यानं चारेक वर्षांतच व्हीआरएसचे सर्व पैसे गमावले होते. आता कंत्राटदाराकडे सिक्युरिटी गार्डची नोकरी करून कसंतरी घर चालवीत होता.

लोक नोकऱ्या गमावतायत, आठ तासांच्या वेतनावर बारा बारा तास राबवून घेतलं जात आहे, महागाईनं कंबरडं मोडलंय. पंतप्रधानांच्या समृद्धीच्या बाता पचत नव्हत्या. परशुराम याच विचारात गढून गेला होता.

‘आता उठा. तोंड धुवा. मग बघा टीव्ही.’ त्याची बायको म्हणाली. इतका वेळ स्वतःच्याच तंद्रीत तो विचार करत होता. अचानक भानावर आला आणि म्हणाला, ‘‘कसला टीवी अन् काय बगायचा. सगळी बोलबच्चनगिरी. होत-जात काय नाय.’’

बाहेर वस्तीत लाउडस्पीकर मोठ्या आवाजात ‘मेरे देश की धरती, सोना उगले...’ गाणं कोकलत होता. ‘सोनं’ पिकवणाऱ्या देशाचे दरिद्री लोक परशुरामला आसपास दिसायचे. त्याची वस्ती आधी होती शहराच्या बाहेर म्हणजे एकदम परिघावर. पण आता शहरच पसरत आलं आणि वस्तीला ओलांडून पुढं गेलं. वस्ती आता चहूबाजूंनी इमारतींनी वेढून गेली होती. हातावर पोट असणारे लोक त्या वस्तीत राहायचे. आधी वस्तीत ना नळ होता ना पाणी. शौचाला उघड्यावर बसायचं आणि रेल्वेलाइनच्या पलीकडे जाऊन पाणी आणायचं.

शहर वाढल्यामुळं इतके दिवस

उपेक्षित असलेली वस्ती आता जरा सुधारू लागली. खरं म्हणजे त्या भागात होणाऱ्या नव्या इमारतवाल्या लोकांच्या डोळ्यांत ती वस्ती खुपू लागली होती. त्यांना वाटायचं, लोकेशन बिघडवणारी, सौंदर्याला बाधा आणणारी ही वस्ती नसती तर किती बरं झालं असतं. त्या भागात अनेक गगनचुंबी इमारती, एक सुपर मॉल आणि मल्टिप्लेक्स थिएटर झालं होतं. फ्लायओव्हरमुळे वस्तीचा एक कोपरा तोडण्यात आला होता. लोकांचे संसार उधळले गेले होते.

काहीजण इकडे तिकडे आसरा शोधायला गेले. पण बरेचजण आपल्या कच्च्याबच्च्यांना घेऊन तिथंच मोकळ्या आकाशाखाली दिवस काढत होते. ज्यानं नुकताच तीन मजली बंगला बांधला होता तो त्या भागाचा नगरसेवक लोकांना पुनर्वसनाचं आश्वासन देत फिरत असे. लोकांचा त्याच्यावर विश्वास नव्हता. पण नाइलाज होता. शेवटी त्यांच्याकडे दुसरा पर्यायच नव्हता. पंतप्रधान जेव्हा या शहरात आले होते, तेव्हा त्यांनी या शहराला शांघाय बनविण्याची घोषणा केली होती. याच नगरसेवकानं इथल्या वस्तीतील लोकांना ट्रक-गाड्यांमध्ये भरून त्या सभेला नेलं होतं व पंतप्रधानांचा जयजयकार करायला लावलं होतं.

विचार करताना परशुरामच्या डोक्याला पार मुंग्या यायच्या. आसपास खूप काही उलटंपालटं घडत असल्याचं त्याला जाणवायचं. असं का होतंय याचं कारण त्याला सापडायचं नाही. कारखान्यात दुपारी जेवताना इतर कामगार सहकाऱ्यांशी तो बोलायचा. पण त्यांच्या जीवनात ज्या उरफाट्या गोष्टी चालू आहेत, त्या का घडतायत, याचं उत्तर कुणाकडंच नसायचं. बुवा-बायांकडे जाणारे काही लोक धर्माचं पतन झाल्यानं असं होत असल्याचं सांगायचे. गुरूकडून मिळालेल्या 'शांती व समाधान' या मंत्राचा जप ते सतत करत राहायचे. हात यंत्रावर आणि मंत्र ओठांवर अशा स्थितीत ते दिवसभर कारखान्यात वावरायचे. पण मालक व मॅनेजरांची दिवसेंदिवस वाढणारी संपत्ती व कष्टकऱ्यांवर ओढवलेल्या विपत्तीचं कारण काय हे त्यांना कळायचं नाही. सगळ्यांच्या डोक्यात वेगवेगळी चक्रं फिरत असायची. पण निळी वर्दी चढवून मशीनवर उभं राहताच, ते सगळे एकसमान व्हायचे.

दिवसेंदिवस त्यांच्यावर कामाचा बोझा वाढत चालला होता, पण पगार वाढत नव्हता. मॅनेजर व इतर अधिकाऱ्यांची वेगानं होणारी उन्नती पाहून ते हैराण होत. कंपनीचा मालक कारखान्यावर वर्षातून दोन-चार वेळाच येत असे. देशभर त्याच्या कंपन्यांचं जाळं पसरलं होतं. आता विदेशातही त्याच्या कंपन्या सुरू होणार होत्या. त्याला सरकारकडून पद्मश्री पुरस्कार मिळाला होता. त्याच्या आलिशान कारमधील डॅशबोर्डवर छोटा तिरंगा होता. तिरंग्याशेजारीच इंग्लंडचा युनियन जॅक आणि अमेरिकेचा फ्लॅगही लावण्यात आलेला होता. 'देशप्रेमी' मालकाचा व्यवसाय देशात आणि परदेशात वेगानं वाढत होता.

खूप वेळ देशभक्तीची गाणी कोकलून परशुरामच्या वस्तीचा लाऊडस्पीकर आता शांत झाला होता. वस्तीच्या मध्यावर असलेल्या घाणेरड्या व मोडक्यातोडक्या समाजमंदिरासमोरील खांबावरचा तिरंगा गलितगात्र होऊन लटकला होता. कदाचित हवेत फडकण्याची त्याची इच्छाच संपून गेली होती. सकाळची रांगोळी पार विस्कटून गेली होती. दुपारी झालेल्या रिमझिम पावसामुळे सगळीकडे चिखलाचा राडा झालेला होता. सकाळी झेंड्याभोवती गोंगाट करणारी मुलं

आता एकदम गायब झाली होती. सकाळी झेंड्याची दोरी पकडून प्रेसला पोज देणारेही आपापल्या आरामअड्ड्यांवर परतले होते. वस्तीतील लोक जणू झेंड्याच्या निर्जीव उपस्थितीकडे दुर्लक्ष करून आपापल्या कामात व्यस्त होते. दुपारचा सुस्तपणा सगळ्या वातावरणात व्यापला होता.

आराम करून झाला होता. टीव्हीवर बघण्यासारखं काही नव्हतं. सगळी दुपार बिछान्यात लोळण्यात गेली. परशुराम संध्याकाळी बायकोसह बाजाराला निघाला. गल्लीच्या कोपऱ्यावर त्याला त्याचा धाकटा मुलगा भेटला. तो बाजारातून आईस्क्रीम केक आणण्याचा हट्ट करू लागला.

परशुराम मनातल्या मनात चरफडला. मुलांच्या मागण्या वाढत चालल्या आहेत. कधी पिझ्झा मागतात तर कधी काही... त्याच्या लहानपणी तर त्यानं अशा खाऊची स्वप्नातसुद्धा कल्पना केली नसेल. जे काही शिजायचं तेच खावं लागायचं. कधी भंगाराचा लोखंडी पत्रा सापडला, प्लास्टिकच्या मोडक्या वस्तू निघाल्या तर ते हातगाडीवाल्याला देऊन बुढ्ढी का बाल खायचे. तेवढीच काय ती मजा. त्यातसुद्धा घरच्यांना कळेल ही भीती. आजकालची मुलं खायला मागतात महागडा खाऊ. हे सर्व या टीव्हीमुळं झालंय. खा, प्या, मजा करा... रात्रंदिवस लोकांना उचकवायचं काम करतो हा टीव्ही.

ते मेनबाजारला पोहोचले. त्यांना त्यापलीकडे भाजीमंडईला जायचं होतं. त्या शहराचा झगमगाट तिथं केंद्रित झाला होता. अशा मेनबाजारातून ते चालले होते. संध्याकाळ संपून रात्र पडू लागली होती. सगळीकडे लाइट्स आणि ग्लोसाईन बोर्ड्सचा भपका होता. रस्त्याच्या दुतर्फा दुकानं, हॉटेल्स आणि शोरूम्सच्या डोळे दिपवणाऱ्या सजावटी होत्या. सामान दुकानांच्या बाहेर अगदी फूटपाथपर्यंत मांडलेलं होतं. गोऱ्यागोमट्या मॅडम आणि साहेबलोक इकडे तिकडे फिरत शॉपिंग करत होते. दुकानदार या विशेष ग्राहकांपुढे मोठ्या अदबीनं वागत होते. काचेच्या मोठमोठ्या दरवाज्यांपुढे अपटूडेट दरबान आत जाणाऱ्या लोकांना कडक सलाम ठोकत होते. शॉपिंग करून बाहेर पडणाऱ्या मडमांचं सामान उचलायला धावून मदत करीत होते. अगदी कारपर्यंत जाऊन सामान आत ठेवण्यासाठी झटत होते. परशुरामला रघू दिसला. तो एका दुकानासमोर वॉचमनच्या वेषात उभा होता.

ग्रॅज्युएट झालेला रघू परशुरामच्या वस्तीत राहायचा. कुठंच चांगली नोकरी न मिळाल्यानं शेवटी तो कंत्राटदाराकडे वॉचमन म्हणून कामाला लागला होता.

कमरेच्या वर असणारे तोडके टीशर्टस् आणि गुडघ्यापर्यंत असणाऱ्या जीन्स घालून तरुण मुली मुलांसोबत इकडे तिकडे बागडत होत्या. सुट्टीचा दिवस असल्यानं त्या रस्त्यावर वाहनांना बंदी घालून शॉपिंग प्लाझा बनवण्यात आलं होतं.

या महागड्या बाजारात खेरदी करण्याची कुवत असणारे या शहरात आहेत? असे किती लोक असतील? परशुरामच्या मनात प्रश्न चमकून गेला. अचानक त्याचं लक्ष गेलं त्याच्या वर्क्स मॅनेजरकडं. त्याचा साहेब काचेच्या त्या आरस्पानी मॅक्डोनाल्ड रेस्टॉरंटमध्ये सहकुटुंब बसला होता. लाल टोमॅटोसारखी त्याची दोन मुलं मोठ्या आनंदानं काहीतरी खात होती. परशुराम एक क्षण थबकला. त्याला त्याच्या लहान मुलानं आईस्क्रीम केकसाठी केलेला हट्ट आठवला.

परशुरामला मिळणाऱ्या पगारात महिना काढणं कठीण जायचं. पगाराच्या दिवशी तो मुलांसाठी खाऊ आणायचा. नंतर मात्र महिनाभर ठणठणगोपाळ.

त्याच्या इतर कामगार सहकाऱ्यांचीही अशीच हालत होती.

वेगवेगळ्या बॅनर, होर्डिंग्ज आणि जाहिरातींनी सगळा बाजार व्यापला होता. स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देण्याची तर स्पर्धाच लागली होती. प्रत्येक विक्रेता आणि कंपनी देशभक्तीच्या नावाखाली माल विकायचा प्रयत्न करीत होते. बॉलपेन, अंडरवेअर्स, चॉकलेट्स, मोबाईल... प्रत्येक वस्तू देशप्रेमाच्या नावावर विकली जात होती. जाहिरात करणारे मिळेल तिथं संधी शोधायचे आणि प्रत्येक गोष्टीचा बाजार मांडायचे. होळी, दिवाळी, नवरात्र, गणेशोत्सव, रक्षाबंधन एवढंच नव्हे तर गणराज्य दिन आणि स्वातंत्र्यदिनसुद्धा त्यांच्या तावडीतून सुटायचा नाही. प्रत्येक भावना, प्रत्येक संवेदना... सगळं काही त्यांच्या जाळ्यात अडकलं होतं. जेव्हा आणि जशी त्यांना गरज वाटत असे, माल विकण्यासाठी त्याचा वापर केला जात असे.

परशुराम आणि त्याची बायको एका भव्य अशा होर्डिंगजवळून चालले होते. होर्डिंगवर एक विशाल चित्र होतं. चित्रात एक अभिनेता हातात मोबाईल घेऊन जोमदारपणे म्हणत होता, 'ऐसी आजादी और कहाँ?'

...बहुतेक ही आजादी शहरातल्या त्या धनदांडग्या लोकांची आजादी होती, जे काहीही करण्यास आजाद (स्वतंत्र) होते.

शहरात ठिकठिकाणी लागलेले होर्डिंग्ज आणि मोठमोठ्या जाहिराती समृद्ध जीवनाचं रंगीबेरंगी चित्र सादर करीत. त्यात दिसणाऱ्या स्त्री-पुरुष, मुलं-मुली आणि युवक-युवतींच्या चेहऱ्यांवर चमक ओसंडून वाहत असे. त्यांचे कपडे, दागिने, साधनसंपत्ती सगळीकडे आनंदीआनंद जाणवत असे... पण पाहणाऱ्यांची नजर त्या होर्डिंगवरून सरकून खाली जमिनीवर येताच एक धूसर, विद्रूप, धूळ आणि धुराने भरलेलं कोंदट व उदास जीवन त्यांच्या नजरेस पडत असे. रस्त्यावर जगणाऱ्या किंवा रस्त्यावरून कामधंद्याकडे पळणाऱ्या लोकांचं जीवन- ज्यात भूक होती, अभाव होता आणि होती उपेक्षा... जी सगळीकडे व्यापून राहिली होती.

लाख प्रयत्न करूनही जाहिरातींची गुलाबी दुनिया या रंग उडालेल्या जगाला झाकून लपवू शकत नव्हती.

भाजीमंडईतून खरेदी झाल्यावर परशुराम आणि त्याची बायको घराकडे परतू लागले. परत येताना परशुरामने पाहिलं, फाटक्या-विरलेल्या साडीतली एक बाई तिच्या दोन लहान मुलांसह फूटपाथवर बसली होती. त्या बाईजवळ एक गाठोडं होतं. त्यातून बांबूच्या छोट्या दांड्यांना चिकटवलेले तिरंगे डोकावत होते. चौकातील सिग्नलवर थांबणाऱ्या गाडीवाल्यांना तिरंगे विकून तो छोटा परिवार एकदम दमून गेला होता. दोन्ही मुलं प्लास्टिकच्या पिशवीत हात घालून, त्यातले भाकरीचे तुकडे काढून खात होते. कृशकाय दिसणारी त्यांची आई दिवसभराच्या चिल्लर पैशांची कमाई मोजत होती.

परशुराम आणि त्याची बायको आपसात बोलत आरामात चालले होते. आसपासच्या सरकारी इमारतींवर रंगीबेरंगी लाईटसच्या माळांची सजावट केलेली होती. रस्त्यावरील सुसाट गाड्यांपासून सुरक्षित अंतर ठेवून ते चालत होते. अचानक छत नसलेल्या दोन उघड्या जिप्सी गाड्या त्यांना खेटून फर्रर्कन पुढे गेल्या. परशुरामची बायको एकदम घाबरून गेली. त्या दोन कारमध्ये धनिकांची मुलंमुली हवेत तिरंगे उडवीत रस्त्यावर धुमाकूळ घालत होती. ते त्यांच्या पद्धतीनं स्वातंत्र्यदिन साजरा करीत होते. परशुरामला खूप राग आला.

थोड्या वेळात त्या गाड्या पुन्हा फिरून आल्या. पुन्हा त्याच प्रकारे आधीच्या तुलनेत या दोघांना जरा जास्तच खेटून सुसाट निघून गेल्या.

परशुराम काही करू शकला नाही. एकदा तर त्याच्या मनात आलं, उचलून दगड, मारावा खेचून.

पण तो हिरमसून गप्प बसला.

ते दोघं गुमान घराकडं चालू लागले. शहराच्या क्लब, डिस्को आणि बिअरबार-डान्सबारकडे धनिकांच्या गाड्या चालल्या होत्या.

स्वातंत्र्याचा दिवस होता. ऐश करणारे ऐश करत होते. त्यांच्या पद्धतीनं स्वातंत्र्यदिन साजरा करत होते.

घरी आल्यावर परशुरामची बायको स्वयंपाकाला लागली. मोठा मुलगा अजून पिकनिकवरून परत आला नव्हता.

परशुराम रात्री जेवायला बसला. त्यानं एका हातानं रिमोट उचलून टीव्ही लावला. पहिला घास तोंडात घालणार तेवढ्यात टीव्हीवर जळणाऱ्या घरांची दृश्यं दिसू लागली. स्क्रीनवर खाली 'ब्रेकिंग न्यूज'ची पट्टी चमकत होती.

खूप वेळ कॅमेरा जळणाऱ्या घरांवर स्थिर होता. मागे फायरब्रिगेडच्या गाड्यांचे आवाज व सायरन ऐकू येत होते.

कॅमेरा अर्धवट जळालेल्या घरांवर फिरत राहिला. नंतर तिथं उपस्थित पत्रकारांवर कॅमेरा रोखला गेला. चॅनलचा तो प्रतिनिधी बोलू लागला, 'आज दुपारी सोनपूर तालुक्याच्या पनही गावात सवर्ण जमीनदारांनी दलितांची पन्नास घरे जाळली. यात तीसजण मृत्युमुखी पडले. जखमींची निश्चित संख्या अद्याप कळू शकलेली नाही. राजधानीपासून केवळ पन्नास किलोमीटर अंतरावर घडलेल्या या घटनेने सगळा देश सुन्न झाला आहे. स्वातंत्र्यदिनाला घडलेल्या या घटनेबद्दल पंतप्रधानांनी खेद व्यक्त केला आहे. गृहमंत्री घटनास्थळाकडे रवाना...'

परशुरामचा घास तोंडाशीच थांबला. तो अवाक होऊन टीव्हीकडं पाहत होता. त्यानं रिमोट घेऊन इतर चॅनल्स लावले. सगळीकडं त्याच घटनेचा वृत्तान्त सांगितला जात होता. तीच दृश्यं पुन्हा पुन्हा दाखवली जात होती. त्यानं कसंतरी जेवण संपवलं.

रात्री खूप उशीरा, जेव्हा सर्व झोपले होते परशुराम जागा होता. जळणाऱ्या घरांतून उठणारा धूर त्याच्या डोळ्यांपुढे तरंगत होता. तो विचार करत होता.

काही दिवसांपूर्वीच राजधानीच्या जवळील औद्योगिक क्षेत्रातील प्रसिद्ध मोटरसायकल कंपनीच्या कामगारांना पोलीस चहूबाजूंनी घेरून गुरासारखे बदडून काढत होते. कामगार निःशस्त्र होते आणि शांततापूर्ण आंदोलन करून त्यांच्या रास्त मागण्या मांडत होते.

पोलिसांची निर्दयता व क्रूरता सगळ्या देशानं टीव्हीवर रोखून पाहिली. ते पाहताना परशुरामच्या मुठी वळल्या. माथ्यावरच्या नसा तडकू लागल्या.

खूप प्रयत्न करूनही परशुरामला झोप लागत नव्हती. त्यानं रिमोट घेऊन पुन्हा सर्व चॅनल्स पाहण्याचा प्रयत्न केला. सगळीकडं अग्निकांडाची बातमी होती. जळालेली घरं, सुन्न चेहरे आणि विषण्ण डोळे होते.

कोणत्याही चॅनलवर सकाळचा सूर्य, उडणारे पक्षी, फडफडणारा तिरंगा दिसत नव्हता.

स्वातंत्र्याची पहाट कुणास ठाऊक कुठे हरवली होती.

सगळीकडे दाटून येणारा काळाकुट्ट अंधार होता. त्या भयाण अंधारात कुठेतरी गुरखा 'जागते रहो'चा पुकारा देत होता. ▣